Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly
Issue XI Vol IV, Jan.- 2021
ISSN : 2319 - 8648
Impact Factor :7.139

# Index


| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Regular Exercise: A Need of Time | Dr.Nirajkumar N. Uplanchwar | 1 |
| 2 | Identity Crisis in Orhan Pamuk's Novel *White Castle:* | Dr. Meghraj N. Pawar | 4 |
| 3 | Socio-Economic Impact of Farmer Suicide on widows of Distressed farmers: A Study of Vidarbha and Marathawada Regions of Maharashtra | Dr. B. D. Kompalwar | 8 |
| 4 | Feminist Approach in the Novel of Margaret At wood: special reference to "*The Handmaid's Tale*" | Mr.Prabhakar Shivraj Swami | 13 |
| 5 | The Changing Roles And Images Of Women In Cinema: A Feminist Study | Tadavi Ramesh M | 18 |
| 6 | State and Prospectus of Unorganized Retail Units in Comparison with Organized Retail Units in Latur City. | Dr.Sachin M.Prayag | 23 |
| 7 | Impact Of Procrastination On Academic Performance Of College Students (With Special Reference To Latur City) | Dr.Sujata N.Chavan | 28 |
| 8 | Public Sector Enterprises: A Current Scenario | Dr. Yogesh M. Kulkarni | 35 |
| 9 | कार्ल मार्क्सच्या वर्ग संघर्ष सिध्दांताचा तात्त्विक अभ्यास | प्रा. डॉ. संतोष गुणवंतराव पाटील | 39 |
| 10 | पेशवेकालीन न्यायमुर्ती राम शास्त्री प्रभुने | डॉ. एन. जी. भद्रे | 42 |
| 11 | आयसीटी साधनसामुग्री आर्टस् ,कॉमर्स आणिसायन्स कॉलेज-कराड आणि पाटण तालुका: एक अभ्यास | प्रा. अनिल शिवाजी पाटील | 45 |
| 12 | स्वातंत्र्याचा जाहिरनामा : केसमुत्तिसुत्त | डॉ. बालाजी मा. गव्हाळे | 55 |
| 13 | साहित्यरत्न अण्णाभाऊसाठे यांचे कादंबरी लेखन | प्रा.डॉ.नारायण शिवशेट्टे | 59 |
| 14 | संस्कृतीनिष्ठ समीक्षा पद्धती आणि मराठी साहित्य | विवेक वसंत कुट्ट | 63 |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर 20 व्या शतकातील एक प्रज्ञावंत समाजसुधारक व राजकारणी | डॉ. ए .एन. सिद्धेवाड | 67 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Half Yearly
Issue XI Vol IV, Jan. 2021
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# संस्कृतीनिष्ठ समीक्षा पद्धती आणि मराठी साहित्य

**साहाय्यक प्राध्यापक श्री.विवेक वसंत कुडू**
मराठी विभाग प्रमुख, मराठी विभाग
सोनोपंत दांडेकर कला, वा.श्री.आपटे वाणिज्य आणि एम. एच. विज्ञान महाविद्यालय पालघर.
vivekkudu@gmail-com

---

कोणतीही समीक्षा ही निर्वात पोकळीत जन्म घेत नाही. तिच्या निर्मितीमागे मानवाच्या सभोवताली असणारी विविध पर्यावरणे, विशिष्ट परिस्थिती आणि मानवी व्यवहार कारणीभूत ठरतात. समीक्षा ही मानवाची मूलभूत गरज आहे असे मला वाटते. आधी घडून गेलेला साहित्य व्यवहार हा समीक्षेचा विषय असतो तसा समीक्षा पुढे येणाऱ्या साहित्य व्यवहाराची दिशा ठरविते. समीक्षा समकालीन साहित्य व्यवहाराचं दर्शन घडविते. व्यापक अर्थाने वाचकांचे जागरण करते असे म्हणायला हरकत नाही. विशिष्ट तत्त्वांमुळे समीक्षा पद्धतीचे विविध प्रकार पडतात. काही समीक्षा पद्धती प्रदेश आणि काल यांच्या सीमारेषा ओलांडतात. काळ बदलत जातो, साहित्य व्यवहार बदलत जातो तशा नव्या समीक्षा पद्धती जन्माला येतात.

संस्कृतीनिष्ठ समीक्षा पद्धती या विषयावर लिहिताना काही प्रश्न उपस्थित झाले. कोणत्या पार्श्वभूमीवर या समीक्षा पद्धतीचा जन्म झाला? म्हणजे तिचा उगम, तिचे स्वरूप त्याची तत्वे कोणती आणि मराठी साहित्य विश्वाशी, समीक्षा व्यवहाराशी काय नाते जोडता येईल? या प्रश्नाच्या अनुषंगाने शोध निबंधात मांडणी आहे.

पाश्चात्य देशात उदयास आलेली, मानव्यविद्यांमध्ये गेल्या अर्ध शतकात नवी असलेली समीक्षा पद्धती म्हणून संस्कृतीनिष्ठ समीक्षा पद्धतीचा विचार केला जातो. संस्कृती म्हणजे उच्च मूल्य भावांची जोपासना अशी पाश्चात्त्य देशात पारंपरिक धारणा होती यातून अभिजाततावादी स्वायत्तवादी सौंदर्यमूल्ये प्रस्थापित झाली. साहित्य लिहिणे म्हणजे अभिजाततावादी उदारमतवादी मानवकेंद्री मूल्यांचा आविष्कार असे समीकरण दृढ बनले याला आव्हान देण्याकरिता या समीक्षा पद्धतीचा उगम झाला.

सांस्कृतिक समीक्षेचा पाया घालणारे समीक्षक म्हणजे रेमंड विल्यम्ज (१९२१ -१९८०) यांनी 'द कल्चर अँन्ड सोसायटी', 'द लॉन्ग रिव्होल्यूशन' हे दोन ग्रंथ लिहिले. या ग्रंथामध्ये संस्कृतीनिष्ठ समीक्षा पद्धतीच्या काही संकल्पना त्यांनी मांडल्या.विल्यम्स यांना ग्रामीण आणि श्रमिक वर्गाची पार्श्वभूमी होती तो समाजवादी राजकीय चळवळीत सहभागी होता त्यानंतर मार्क्सवादी चळवळीत देखील तो सहभागी झाला होता.

इंग्लड मध्ये रिचर्ड होगर्ट आणि स्टुअर्ट हॉल यांनी बर्मिंगहम विद्यापीठामध्ये 'सेंटर फॉर कंटेम्पररी कल्चरल स्टडीज' संस्था स्थापन केली. ह्या स्थापनेने सांस्कृतिक समीक्षेची पायाभरणी घातली. यातील होगर्टला अभिप्रेत असलेला संस्कृतीचा अर्थ लक्षात घेता. आपल्याला ते कोणत्या वर्गाचे प्रतिनिधित्व करतात हे दिसून येते . होगर्ट म्हणतो, 'श्रमिक वर्गाची संस्कृती साधी काही

वेळा बालीशही वाटते परंतु ती अस्सल आहे आणि या संस्कृतीने एका फार मोठ्या वर्गाला सकारात्मक जीवन जगण्याची प्रेरणा दिली आहे.'

संस्कृती समीक्षा म्हणजे काय नाही ते सांगता येईल. हा कोणत्याही संस्कृतीचा त्यातील आहार, आचार, पेहराव, सण आणि सोहळे यांचा अभ्यास नाही किंवा दोन संस्कृतींची तुलनाही नाही. हा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्र मानववंशशास्त्र या ज्ञानशाखा आहेत. हा एक व्यापक अभ्यास आहे. अब्रास -हर्फम व्याख्या पाहू 'सर्व प्रकारचे संस्थात्मक व्यवहार आणि उत्पादने यांची निर्मिती उपयोग आणि सांस्कृतिक महत्त्व यांचा अभ्यास करणारा हा आंतरशाखीय प्रकल्प आहे.' यामध्ये चित्रपट मनोरंजनाचे जग, लोकप्रिय साहित्य, जाहिराती, घोषणा, दूरदर्शन वरील मालिका, तरुणांची संस्कृती यासारख्या विषयांचा अभ्यास केला जातो.

मूल्यभानाची सामग्री या आपल्या ग्रंथात समीक्षक हरिश्चंद्र थोरात म्हणतात, 'या ज्ञानशाखेने मार्क्सवाद, संरचनावाद, उत्तर-संरचनावाद, स्त्रीवाद यांच्याकडून बौद्धिक ऋण घेतले आहे आणि साहित्याभ्यास, समाजशास्त्र यांच्याकडून ज्ञानशाखात्मक परिसर स्वीकारला आहे. इतिहास आणि राज्यशास्त्र यांच्याशी या समीक्षेचे नाते आहे.' तसेच 'संस्कृतीचा सौंदर्यात्म, अभिजात आणि मूल्यवाचक मुलामा खरवडून त्यातील सत्तेचे षडयंत्र स्पष्ट करण्याचा प्रयत्न संस्कृती अभ्यासात असतो.' हे विवेचन आपल्याला या अभ्यासशाखेबद्दल नेमकी माहिती देते.

वरील सर्व ज्ञानशाखा आहेत त्यामधील सांस्कृतिक अभ्यास हा संस्कृतीनिष्ठ समीक्षेत समाविष्ट होऊ शकतो. एडवर्ड यांनी प्राच्यविद्या हे विद्या क्षेत्र वसाहतवादी वर्चस्वाचे संभाषित आहे असे म्हणणे किंवा देशीवादामध्ये स्वत:च्या संस्कृतीची जोपासना करणे हे तत्व, किंवा अंतोनिया ग्रामची यांनी मांडलेली सांस्कृतिक वर्चस्वाची संकल्पना हीदेखील यात अंतर्भूत होते. 'कामगार वर्ग हा केवळ अर्थव्यवस्थेमध्ये क्रांती घडवून आणून मुक्ती मिळू शकत नाही तर भौतिक लढ्याद्वारे ही मिळू शकतो. सत्ताधारी वर्ग विविध मार्गांनी आपले वर्चस्व अबाधित ठेवतो' ही ग्रामची यांची भूमिका आहे. या सर्व भूमिका संस्कृतीनिष्ठ समीक्षेच्या जवळ जाणाऱ्या आहेत. हा एक आंतरशाखीय अभ्यास आहे पण यास निश्चित अभ्यास पद्धती नाही. राजकीय भूमिका, जहाल डावी भूमिका म्हणून ओळखले जाते तसेच मार्क्सवादाच्या चिकित्सक मांडणीतून या अभ्यासाचा उगम झाला आहे असेही म्हटले जाते.

**संस्कृतीनिष्ठ समीक्षा पद्धतीची तत्वे**

अभ्यास विषयाची निवड आणि मांडणी सामजिक न्याय समता आणि लोकशाही मूल्यांच्या संदर्भात करणे. सर्वसामान्य ज्ञानाला प्रश्न विचारणे.अभ्यास कोणत्या तरी संदर्भात अभ्यास करणे. कलाकृतीचा विचार करताना सौंदर्य मूल्यांना महत्त्व न देता सामाजिक संदर्भात, रूपनिष्ठ स्वायत्त तत्वांच्या सहाय्याने न करता सामाजिक, राजकीय व ऐतिहासिक तत्त्वांच्या साह्याने केला जातो.त्या सर्व लिंगभाव वंश यासारख्या विषमतामूलक गोष्टींचा संस्कृतीशी घनिष्ठ संबंध असे मानले जाते. श्रेष्ठ साहित्य परंपरा आणि श्रेणीव्यवस्था यांना नकार, उदारमतवादी मानवतावादास नकार बहुजन संस्कृती आणि बहुजन समाजाचे साहित्य यांना मध्यवर्ती स्थान, स्त्रीवादी साहित्य, लोकप्रिय कला आणि साहित्य यांना चालना पारंपारिक ज्ञानातील एकसत्त्वीकरण टाळून सामाजिक वास्तवाला घडविणाऱ्या घटकांमधील परस्पर संबंध उलगडून दाखविले जातात. बहुसांस्कृतिकतेचे अधोरेखन, विविध केंद्रवादाला नकार 'पारंपारिक साहित्य अभ्यासामध्ये जो एक सांस्कृतिक आवाज

अभिजनकेंद्रवाद, युरोकेंद्रवाद, पुरुषकेंद्रवाद या ज्या प्रवृत्ती आहेत त्यांना छेद देऊन एक बहुसांस्कृतिकवाद व बहुजनवाद जोपासणे हे या समीक्षा पद्धतीचे लक्ष आहे.'

स्त्रियांचे साहित्य, बहुजन वर्गाचे साहित्य, बहुजन अभिरुची रुचणारे लोकप्रिय साहित्य, श्रमिक वर्गाचे साहित्य, चित्रपट दूरदर्शन जनसंपर्क यात येणारे संस्कृतीत चित्र यांना अभ्यासक्रमात स्थान मिळावे म्हणून अमेरिकन व ब्रिटिश विद्यापीठांत चळवळी देखील झाल्या आहेत. उदाहरणादाखल दोन विषय आपण पाहू निकोलस गार्नहम यांनी प्रसारमाध्यमांची चिकित्सा केली आहे तर स्टुअर्ट हॉल- तरुणांची उपसंस्कृती या विषयावर अभ्यास केला आहे.

भारतीय अनेक अभ्यासकांनी असा अभ्यास करणे आता सुरू केले आहे. होमी भाभा यांची संकरही संकल्पना आणि गायत्री स्पीवाक यांची रचिताची मांडणी यांचा समावेश यात होतो. गिरीश कर्नाड यांची भाषणे या भाषणातून त्यांनी बहुजनांच्या कला या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या किंबहुना त्या मुक्त झाल्या अशी सातत्याने मांडणी केली आहे.

**संस्कृतिनिष्ठ समीक्षा पद्धती आणि मराठी साहित्य:**

समीक्षात्मक मांडणीचा विचार केला तर मिलिंद मालशे /अशोक जोशी, हरिश्चंद्र थोरात, वसंत आबाजी डहाके, प्रभाकर देसाई, मनोज पाथरकर इत्यादी मान्यवरांनी या संदर्भात लेखन केले आहे. आजवर महात्मा फुले डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संस्कृतीच्या संदर्भातले विचार तसेच दलित साहित्य रा.ग.जाधव यांची साहित्याचे परिस्थिती विज्ञान ही संकल्पना यांचा अनुबंध तपासता येईल. डॉ.मनोज पाथरकर यांच्या मते मराठी साहित्यात सांस्कृतिक अभ्यास या दृष्टिकोणाची कमतरता आहे. मराठी साहित्याच्या संदर्भात आपल्याला असा अभ्यास करता येईल. या शिवाय अस्सल लोक संस्कृतीवर बाजारप्रणीत लोकप्रिय संस्कृतीचा झालेला परिणाम अभ्यासणे, सांस्कृतिक धोरणे त्यामागील प्रच्छन्न हेतु शोधणे, सांस्कृतिक वर्चस्वाचा शोध घेणे, सांस्कृतिक दिशाभूल आणि सपाटीकरणाला विरोध करणे, सांस्कृतिक वेडाचार शोधून काढणे, नव सांस्कृतिक रचना निर्मिती करणे. या हेतूने भारतीय संदर्भात संस्कृतीनिष्ठ समीक्षेचा किंवा दृष्टिकोनाचा विचार करता येईल.

**संस्कृतीनिष्ठ समीक्षा पध्दती पेच अथवा मर्यादा**

'संस्कृती' या संकल्पनेची मांडणी सौंदर्यमूल्य अंग नाकारून ऐतिहासिक व राजकीय अंगाने केली जाते .साहित्य' या संकल्पनेला देखील येथे सौंदर्य मूल्यांपासून दूर करून राजकीय स्वरूप दिले जाते. साहित्य हा केवळ एक घटक आहे सांस्कृतिक अभ्यासामध्ये साहित्यही केंद्रस्थानी नाही. संहिता निवड आणि महत्त्व कशाच्या आधारे निश्चित, अमुक संहिता इतर संहितांपेक्षा महत्वाची का मानायची याची उत्तरे संस्कृतीनिष्ठ समीक्षा पद्धती देत नाही. संस्कृती आणि उपसंस्कृती या संकल्पनेसमोर समस्या निर्माण होतात. समजा उपसंस्कृती कालांतराने मूळ संस्कृतीत रुपांतरीत झाली तर पुन्हा पेच उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**निष्कर्ष :**

- संस्कृतीनिष्ठ समीक्षा हा मराठी साहित्यात नव्याने आलेला समीक्षाप्रवाह आहे. या समीक्षा पद्धतीचा उगम पाश्चात्य देशात झाला आहे.
- अनेक ज्ञान व्यूहांना तो सामावून घेतो. तिच्यात अनेक ज्ञानशाखा एकत्र आल्या आहेत.
- पारंपरिक संस्कृती अभ्यास म्हणजे संस्कृतीनिष्ठ समीक्षा नव्हे.

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

- केवळ साहित्यच या समीक्षेच्या केंद्रस्थानी नाही तर इतर अनेक व्यवहार या दृष्टिकोनातून तपासले जातात.
- संस्कृतीचे एका त-हेचे हे मूल्यमापन असते. त्यामागील सत्तेचे राजकारण शोधण्याचा प्रयत्न ही समीक्षा करते.
- नव्या सांस्कृतिक व्यवस्थेचा आग्रह देखील ही समीक्षा पद्धती धरते. ही एक राजकीय भूमिका आहे.
- एखाद्या कलाकृतीचा विचार तिचे रूपतत्त्व बाजुला सारून सामाजिक, राजकीय व ऐतिहासिक तत्त्वांच्या साह्याने केला जातो.

**संदर्भ साधने:**


- मालशे मिलिंद/ जोशी अशोक (१ मे २००७) आधुनिक समीक्षा सिद्धांत (पहिली आवृत्ती) मौज प्रकाशन, मुंबई.
- थोरात हरिश्चंद्र (२०१६) मूल्यभानाची सामग्री (प्रथम आवृत्ती),शब्द प्रकाशन, मुंबई.
- पाथरकर मनोज (डिसेंबर २०२०), लेख: सांस्कृतिक अभ्यास: चिन्हांच्या 'अर्थव्यवस्थेचा राजकीय गुंता, संभाषित (वर्ष ०१ अंक ०४)
- साहित्य समीक्षा सांस्कृतिक समीक्षा
- https%@@mr-vikaspedia-